निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
१९ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२५ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त



### जालन्यात अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघातर्फे 'दर्पण दिन' उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या ऐतिहासिक स्मृतीप्रित्यर्थ, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघातर्फे जालना येथे १० जानेवारी २०२५ रोजी 'दर्पण दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पत्रकारितेतील आद्य ऋषी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार बाबुराव व्यवहारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते तुलजेस भैय्या चौधरी उपस्थित होते.व्यासपीठावर पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी होती. यात प्रामुख्याने,ज्येष्ठ पत्रकार: विनायक दहातोंडे, विलास खानापुरे, बाबुजी तिवारी (मंठा),संपादक व पदाधिकारी: अर्पण गोयल, पारसनंद यादव, अहेमद नूर, श्रीकिशन झंवर, लियाकत अली खान,इतर मान्यवर: एल.एम. कुरेशी (परतूर), साईनाथ चिन्नादोरे, ॲड. महेश धन्नावत, ज्येष्ठ डीटीपी ऑपरेटर मधुकर मुळे, आणि ज्येष्ठ मशीन चालक शेख शफीभाई यांची उपस्थिती लक्षणीय होती.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे तुलजेस भैय्या चौधरी म्हणाले की, आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे रचला. समाजातल्या अनैतिक आणि अन्यायी प्रवृत्तीवर आपल्या लेखणीने प्रहार करणारा वारसा त्यांनी आपल्याला दिला आहे. वास्तव घटनांचे अचूक चित्रण करून समाजाला दिशा देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.या सोहळ्याला जालना जिल्ह्यातील अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते. यामध्ये बद्री उपरे, मनिष तिवारी, अजयअण्णा देशपांडे, सांडु तातडे, सरफराज नाईकवाडे, सय्यद महेबुब, लक्ष्मीचंद जांगडे, कादरी हुसेन, विजय जाधव, धनंजय देशमुख, अंकुश गायकवाड, कृष्णा पठाडे, हिरालाल पिपरिये, इसाक कुरेशी, शेख इलियास अब्बास, दर्पण सकलेचा आदींचा समावेश होता.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आशिष रसाळ यांनी प्रभावीपणे केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुयोग खर्डेकर, विकास काळे, देवचंद सावरे, आकाश माने, राजेश गौड, युवराज कुरील, गौतम वाघमारे, विजय वैष्णव, नटवर किल्लेदार आणि मितवा रामरख्या यांनी विशेष परिश्रम घेतले.

### नांदेड डाक विभागात 'विमा सल्लागार' पदासाठी भरती

**२३ जानेवारी रोजी थेट मुलाखती**

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/प्रतिनिधी**/नांदेड डाक विभागांतर्गत डाक जीवन विमा (PLI) आणि ग्रामीण डाक जीवन विमा (RPLI) योजनांच्या प्रचारासाठी 'डायरेक्ट एजंट' (विमा सल्लागार) पदांची भरती जाहीर करण्यात आली आहे. या पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ रोजी थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अधिक्षक डाकघर कार्यालय, नांदेड विभाग यांनी केले आहे.

महत्वाची माहिती आणि वेळापत्रक

मुलाखतीचा दिनांक: २३ जानेवारी २०२६ (शुक्रवार)

वेळ: सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत

स्थळ: अधिक्षक डाकघर कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड - ४३१६०१.अर्ज कोठे मिळतील? सदर अर्जाचा नमुना अधिक्षक डाकघर कार्यालय, नांदेड येथे उपलब्ध आहे.

पात्रता आणि अटी

या भरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे:

पात्रता: केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे मान्यताप्राप्त बोर्डाची १० वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.

वयोमर्यादा: मुलाखतीच्या दिवशी वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे. कोण अर्ज करू शकतात? बेरोजगार युवक, स्वयंरोजगार करणारे, माजी विमा सल्लागार, माजी सैनिक, सेवानिवृत्त शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्त्या, महिला मंडळ कार्यकर्त्या, ग्राम प्रधान आणि ग्रामपंचायत सदस्य.निवड प्रक्रिया: उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्वारे होईल. यामध्ये उमेदवाराचे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, विमा क्षेत्रातील ज्ञान, संगणक ज्ञान आणि स्थानिक भौगोलिक भागाची माहिती तपासली जाईल.

१. सुरक्षा ठेव: निवड झालेल्या उमेदवाराला ५ हजार रुपये सुरक्षा ठेव म्हणून (NSC/KVP स्वरूपात) अधिक्षक डाकघर यांच्या नावाने जमा करावे लागतील. २. परवाना (License): सुरुवातीला प्रशिक्षणांनंतर तात्पुरता परवाना दिला जाईल. मात्र, ३ वर्षांच्या आत IRDA ची परवाना परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे, त्यानंतरच कायमस्वरूपी परवाना दिला जाईल. ३. स्वरुप: ही नियुक्ती पूर्णपणे परवाना आणि कमिशन तत्वावर आधारित असेल. आवश्यक कागदपत्रे मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी खालील कागदपत्रे स्वखर्चाने सोबत आणावीत:अद्ययावत बायोडाटा ,मूळ शैक्षणिक कागदपत्रे व प्रमाणपत्रे,अनुभव प्रमाणपत्र (असल्यास),ओळखपत्र व पासपोर्ट फोटो,इच्छुक पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक विभागाकडून करण्यात आले आहे.

**बीडमध्ये राष्ट्रवादीला धक्का**

# एकेकाळच्या पंकजा मुंडेंच्या खास; माजी आमदार संगीता ठोंबरे शिवसेनेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड /प्रतिनिधी**/ जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठी धक्का बसला आहे. माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशावेळी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ हे देखील उपस्थित होते.

संगीता ठोंबरे यांच्या प्रवेशामुळं बीड जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढण्यास मदत होणार आहे.बीड जिल्ह्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार राहिलेल्या संगीता ठोंबरे यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. दरम्यान, संगीता ठोंबरे यांच्या प्रवेशामुळं केज विधानसभेमध्ये शिवसेनेला बळ मिळणार असल्याचं बोलले जात आहे. संगीता ठोंबरे यांनी खासदार बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्थीने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला होता. आता बीड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी संगीता ठोंबरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्याची चर्चा सुरु आहे. संगीता ठोंबरे या एकेकाळी मंत्री पंकजा मुंडे यांच्या अत्यंत विश्वासू सहकारी मानल्या जात होत्या. केज मतदारसंघातून संगीता ठोंबरे (डरपसशशींर ढहोलीश) २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने त्यांच्या ऐवजी नमिता मुंदडा यांना उमेदवारी दिली होती, त्यामुळं त्या नाराज झाल्या होत्या.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत देखील केज विधानसभा मतदारसंघातून नमिता मुंदडा यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली होती. त्यानंतर भाजपाच्या माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी संगीता ठोंबरे यांनी केज विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मागे घेतला होता.

आपला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेत ठोंबरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला पाठिंबा दिला होता. त्यामुळे संगीता ठोंबरे यांनी थेट भाजपाला आव्हान दिले होते. त्यानंतर, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केला होता. त्यांच्या प्रवेशाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षाला बळ मिळालं होतं. मात्र, आज संगीता ठोंबरे यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानं शरद पवार गटाला फटका बसला आहे.

बीड: जिल्हा परिषद निवडणुकांच्या रणधुमाळीपूर्वीच बीड जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला जिल्ह्यामध्ये भगदाड पडले असून, माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी राष्ट्रवादीला 'जय महाराष्ट्र' करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर



प्रवेश केला आहे.

या निर्णयामुळे शरद पवार गटाच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लागला असून जिल्ह्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

**बीडच्या राजकारणात भूकंप; 'बजरंग' बळी?**

काही महिन्यांपूर्वीच खासदार बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्थीने मोठ्या थाटामाटात संगीता ठोंबरे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला होता. विधानसभेला अपक्ष अर्ज मागे घेऊन त्यांनी राष्ट्रवादीला साथ दिली होती. मात्र, अवघ्या काही काळातच त्यांनी पवारांची साथ सोडून शिंदेंच्या धनुष्यबाणाशी जवळीक साधल्याने खासदार बजरंग सोनवणे यांच्या रणनीतीला हा मोठा तडाखा मानला जात आहे.

**राजकीय पुनर्वसनासाठी 'शिवबंधन'?**

संगीता ठोंबरे यांच्या या पक्षप्रवेशामागे बीड जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे समीकरण असल्याचे बोलले जात आहे.२०१४ चा इतिहास: पंकजा मुंडे यांच्या अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी केजमधून विजय मिळवला होता.२०१९ चा अन्याय: भाजपने उमेदवारी नाकारल्याने त्या नाराज होत्या.२०२४ ची बंडखोरी: विधानसभेत भाजपने पुन्हा नमिता मुंदडा यांना संधी दिल्याने ठोंबरेंनी बंडखोरी केली होती. आता शिवसेनेत प्रवेश करून त्यांनी आपल्या राजकीय अस्तित्वाची आणि सत्तेची नवी गणिते मांडली आहेत. ठोंबरेंच्या प्रवेशाने काय बदलणार?

या प्रवेशावेळी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची विशेष उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यात शिवसेनेचा (शिंदे गट) विस्तार करण्यासाठी शिरसाट यांनी मोठी खेळी खेळल्याचे दिसून येत आहे. संगीता ठोंबरे यांच्या रूपाने एक आक्रमक चेहरा शिवसेनेला मिळाला असून, केजसह संपूर्ण जिल्ह्यात आता शिवसेनेचा भगवा अधिक जोमाने फडकणार, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.शरद पवार गटाने ज्यांना पक्षात घेऊन ताकद वाढवण्याचा प्रयत्न केला, त्याच नेत्यांनी आता साथ सोडल्याने 'तुतारी'चा आवाज बीडमध्ये कमी होणार का? असा सवाल आता राजकीय वर्तुळात विचारला जात आहे.

### एकनाथ शिंदे यांची नाराजी आणि 'भाकरी फिरवण्याची' तयारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पक्षातील काही मंत्री आणि आमदारांच्या कामगिरीवर कमालीचे नाराज आहेत. निवडणुकीपूर्वी ज्या मंत्र्यांवर जिल्ह्यांची जबाबदारी सोपवली होती, तिथे अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. विशेषतः ठाणे आणि कल्याण-डोंबिवली वगळता इतर जिल्ह्यांमध्ये पक्षाची पीछेहाट झाली आहे. त्यामुळे 'भाकरी फिरवण्याच्या' हालचालींना वेग आला असून, अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू देऊन नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे.मुंबई महानगरपालिकेत भाजप-शिंदे युतीला बहुमत मिळाले असले तरी, शिंदेंच्या शिवसेनेला केवळ २९ जागांवर समाधान मानावे लागले.याची काही प्रमुख कारणे चर्चेत आहेत.अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या मुलांना किंवा नातेवाईकांना तिकिटे दिली गेली, ज्यांचा पराभव झाला (उदा. सदा सरवणकर, रवींद्र वायकर, राहुल शेवाळे, अशोक पाटील यांच्या नातेवाईकांचा पराभव).भाजपने मेरिटच्या आधारावर ९० जागा शिंदेंना दिल्या, मात्र त्यात भविष्यातील राजकीय गणिते लक्षात ठेवून कठीण जागांचा समावेश होता. शिंदे यांचे लक्ष ठाणे आणि कल्याणवर अधिक केंद्रित राहिल्याने मुंबईतील स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी दिसून आली.

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सत्ता स्थापनेसाठी आता राजकीय हालचालींना प्रचंड वेग

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/कल्याण-डोंबिवलीत बहुमताचा ६२ हा आकडा गाठण्यासाठी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात 'मोठा भाऊ' ठरण्याची चढाओढ सुरू झाली आहे. सध्या शिंदे गटाकडे ५३ तर भाजपकडे ५० जागा आहेत. सत्ता स्थापनेसाठी ठाकरे गट (११ जागा) आणि मनसे (५ जागा) यांच्या नगरसेवकांना गळाला लावण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर, शिवसेना ठाकरे गटाचे ९ नगरसेवक अज्ञात स्थळी हलवण्यात आले आहेत. भाजप आणि शिंदे गटाकडून फोडाफोडी होण्याची भीती असल्याने ठाकरे गटाने ही सावधगिरी बाळगली आहे. मात्र, ठाकरे गटाचे दोन नगरसेवक अद्यापही शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे.निवडणुकीपूर्वी भाजपचे रवींद्र चव्हाण यांनी 'स्वबळाचा' नारा दिला होता, तर जागावाटपात शिंदे गटाला झुकते माप मिळाले होते. प्रचारात महायुती असली तरी जमिनीवर दोन्ही पक्षांत संघर्ष पाहायला मिळाला. आता अपक्ष, मनसे आणि इतर छोट्या पक्षांच्या मदतीने महापालिकेवर आपलाच महापौर बसवण्यासाठी दोन्ही सत्ताधारी पक्षांनी कंबर कसली आहे. यामुळे केडीएमसीत नेमकं कोणाचं पारडं जड ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## समरजित घाटगे पुन्हा भाजपमध्ये; चंद्रकांत पाटलांनी स्पष्टच सांगितलं!

**आत्ताच एक्सप्रेस**

**कोल्हापूर/प्रतिनिधी**/विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर 'तुतारी' फुंकणारे शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे पुन्हा एकदा भाजपच्या गोटात सामील होणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला असून, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घाटगे यांच्या प्रवेशाबाबत मोठी घोषणा केली आहे.

समरजित घाटगे आता भाजपच्या विचारांसोबत (ब्रॉड फोल्डमध्ये) आले आहेत, त्यांचा अधिकृत पक्षप्रवेश ही आता केवळ तांत्रिक बाब उरली आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

कोल्हापूर दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी घाटगे यांच्या पुनरागमनावर शिक्कामोर्तब केले. ते म्हणाले समरजित घाटगे आमच्यासोबतच आहेत. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका त्यांचे कार्यकर्ते 'कमळ' चिन्हावरच लढवणार आहेत. महायुतीच्या बैठकीलाही त्यांची उपस्थिती होती.

त्यामुळे त्यांचा भाजप प्रवेश निश्चित असून लवकरच त्याचा मुहूर्त जाहीर होईल.

कागलमध्ये मुश्रीफ-घाटगे युतीची नांदी?

काही महिन्यांपूर्वी कागल विधानसभा मतदारसंघात हसन मुश्रीफ आणि समरजित घाटगे यांच्यात विस्तवही जात नव्हता. मात्र, नुकत्याच झालेल्या कागल नगरपालिका निवडणुकीत हसन मुश्रीफ आणि समरजित घाटगे यांनी अनपेक्षितपणे हातमिळवणी केली.

या युतीने शिवसेना (शिंदे गट) आणि इतर विरोधकांचा धुव्वा उडवत २३ पैकी २३ जागा जिंकून 'व्हाईट वॉश' दिला. या विजयानंतरच घाटगे पुन्हा भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा रंगली होती.

पराभवानंतर राजकीय समीकरणं बदलली!

विधानसभा निवडणुकीत महायुतीकडून हसन मुश्रीफ यांना उमेदवारी मिळाल्याने नाराज झालेल्या घाटगे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला होता.

मात्र, अटीतटीच्या लढतीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. सत्तेची समीकरणं आणि स्थानिक राजकारणाची गरज ओळखून घाटगे यांनी पुन्हा एकदा भाजपचा रस्ता धरल्याचे बोलले जात आहे.

घरवापसी निश्चित: समरजित घाटगे लवकरच अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश करणार,चिन्ह ठरलं: आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घाटगे गट 'कमळ' चिन्हावर लढणार, महायुतीची ताकद वाढणार: घाटगे यांच्या पुनरागमनामुळे कोल्हापूर जिल्ह्यात भाजपची ताकद पुन्हा वाढणार आहे.विरोधकांना धक्का: शरद पवार गटासाठी कोल्हापुरातील हा मोठा धक्का मानला जात आहे.

## महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसला रवाना

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला जागतिक गती देण्यासाठी आणि राज्याला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज स्वित्झर्लंडमधील दावोस येथे होणाऱ्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (थएऋ) २०२६' साठी रवाना झाले आहेत. या दौऱ्यात त्यांच्यासोबत उद्योगमंत्री उदय सामंत आणि राज्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ आहे.

**दावोस परिषदेत 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'चा डंका; १६ लाख कोटींच्या गुंतवणुकीचा विक्रम मोडण्याचा निर्धार**

गुंतवणुकीचे नवे उद्दिष्ट: गेल्या वर्षी महाराष्ट्राने दावोसमध्ये तब्बल १६ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले होते. यावर्षी हा विक्रम मोडून त्यापेक्षा मोठी गुंतवणूक राज्यात आणण्याचे राज्य सरकारचे लक्ष्य आहे.ग्लोबल इंजिन महाराष्ट्र: भारताच्या एकूण विकासगाथेत महाराष्ट्राचे योगदान महत्त्वपूर्ण असून, जगाचे लक्ष राज्याच्या 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' या ब्रँडकडे लागलेले आहे.मुख्यमंत्री दावोसमध्ये जागतिक स्तरावरील आघाडीचे उद्योगपती, सीईओ, गुंतवणूकदार आणि विविध देशांच्या धोरणकर्त्यांशी थेट चर्चा करणार आहेत.

राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती व्हावी आणि पायाभूत सुविधांचा विकास व्हावा, यासाठी मुख्यमंत्री खालील क्षेत्रांमधील गुंतवणुकीवर भर देणार आहेत: १. थेट विदेशी गुंतवणूक जागतिक कंपन्यांना महाराष्ट्रात प्रकल्प सुरू करण्यासाठी आकर्षित करणे. २. औद्योगिक तंत्रज्ञान: प्रगत तंत्रज्ञान आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात राज्याची भागीदारी वाढवणे. ३. शाश्वत विकास: हरित ऊर्जा आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांना प्राधान्य देणे. ४. रोजगार निर्मिती: मोठ्या औद्योगिक प्रकल्पांच्या माध्यमातून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

रवाना होण्यापूर्वी प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,महाराष्ट्र हे भारताचे विकासाचे इंजिन



आहे. १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ही परिषद एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरेल. आम्ही केवळ करार करण्यासाठी नाही, तर ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आणि महाराष्ट्रातील जनतेला प्रगतीची नवी दारे उघडून देण्यासाठी दावोसला जात आहोत.जागतिक मंदीची शक्यता आणि बदलती भू-राजकीय स्थिती असताना, महाराष्ट्राने सुरक्षित आणि प्रगत गुंतवणुकीचे ठिकाण म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. या दौऱ्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), सेमीकंडक्टर आणि रस्ते-पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांत मोठी क्रांती होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### जि.प.व पं.समिती निवडणूक: उमेदवारी अर्जासाठी बाँड, नोटरीची गरज नाही; केवळ 'स्वयंघोषणापत्र' पुरेसे

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि फुलंब्री पंचायत समितीच्या आगामी निवडणुकांसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवारांना आता कोणत्याही प्रकारचा स्टॅम्प पेपर (बॉण्ड) किंवा नोटरी करण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी केवळ स्वयंघोषित शपथपत्र सादर करणे पुरेसे ठरेल, अशी महत्त्वपूर्ण माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांनी दिली.

शनिवार, १७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी योगिता खटावकर आणि नायब तहसीलदार संजीव राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.मतदार संख्या: फुलंब्री तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीसाठी एकूण १ लाख २७ हजार ८२३ मतदार आपला हक्क बजावणार आहेत.निवडणूक खर्च: उमेदवाराने अर्ज दाखल केल्याच्या दिवसापासून दररोजचा खर्च निवडणूक विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे. विशेष म्हणजे, ज्या उमेदवारांनी अर्ज भरून नंतर मागे घेतला आहे, त्यांनाही त्या कालावधीतील खर्चाचा हिशोब द्यावा लागणार आहे.सूचक नियम: उमेदवारी अर्ज भरताना संबंधित गट किंवा गणातून एक सूचक असणे आवश्यक आहे. उमेदवाराचा पती किंवा पत्नी सूचक होऊ शकतात, मात्र तो सूचक त्याच मतदारसंघातील (गटातील) मतदार असणे अनिवार्य आहे. एबी फॉर्मची अट: पक्षाकडून उमेदवारी अर्ज भरणाऱ्या उमेदवारांना वेळेत 'बी-फॉर्म' सादर करावा लागेल. जर विहित मुदतीत पक्षाचा फॉर्म मिळाला नाही, तर अशा उमेदवाराला 'अपक्ष' म्हणून गणले जाईल.निवडणुकीच्या काळात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी घ्यावी, असे आवाहन नीलम बाफना यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सत्तेच्या खुर्चीला 'बेकायदेशीर' बांधकामाची वाळवी!

**जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीचा धुराळा खाली बसतो न बसतो, तोच नवनिर्वाचित नगरसेवकांच्या गळ्यात विजयाची माळ पडण्याऐवजी अपात्रतेची टांगती तलवार लटकू लागली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १० (१डी) बाबत दिलेला निकाल म्हणजे केवळ कायदेशीर निर्वाळा नसून, राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि भ्रष्टाचाराचे 'सिमेंटिकरण' करणाऱ्यांविरुद्ध पुकारलेले रणशिंग आहे. 'निवडून आलो म्हणजे सात पिढ्यांचा उद्धार करण्याचा परवाना मिळाला' अशा थाटात वावरणाऱ्या लोकप्रतिनिधींसाठी हा निकाल म्हणजे एक जबरदस्त चपराक आहे.**

**उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, नगरसेवक होण्यापूर्वी केलेले अनधिकृत बांधकामही अपात्रतेसाठी पुरेसे आहे. कायद्यातील पळवाटा शोधून सत्तेचा सोपान चढणाऱ्यांसाठी हे धोक्याचे संकेत आहेत. ड. महेश धनावत यांनी म्हटल्याप्रमाणे, हा निर्णय 'राजकारणाच्या शुद्धीकरणासाठी' मैलाचा दगड ठरणार आहे.**

**जर कायदा करणाऱ्यांनीच किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांनीच घराची वीट अन् वीट बेकायदेशीरपणे रचली असेल, तर त्यांनी सामान्यांच्या तक्रारी ऐकण्याची नैतिक पात्रता गमावलेली असते.**

**पूर्वलक्ष्यी प्रभावः निवडून येण्यापूर्वी केलेले अनधिकृत बांधकामही अपात्रतेस पात्र ठरेल.**

**थेट जबाबदारी: जर बांधकाम नगरसेवकाने स्वतः किंवा त्याच्या आश्रितांनी केले असेल, तरच कारवाई होईल. खरेदी करण्यापूर्वीच्या बांधकामातून सूट देऊन न्यायालयाने नैसर्गिक न्यायाचे तत्त्व जपले आहे.**

**प्रक्रियेचे पावित्र्यः आयुक्तांनी थेट न्यायाधीशांकडे न जाता महासभेच्या विनंतीनुसार प्रक्रिया पार पाडावी, असे सांगून लोकशाही संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.**

**जालन्याच्या राजकीय वर्तुळात या निकालामुळे पोटशूळ उठणे स्वाभाविक आहे. अनेक महाभागांनी आपल्या पदाचा वापर करून किंवा भविष्यातील सत्तेच्या आशेने शहराच्या नकाशावर अनधिकृत बांधकामांचे इमले उभे केले आहेत. 'आपलं कोण काय वाकडं करणार?' या अविर्भावात असलेल्या अनेकांना आता मालमत्ता पत्रके आणि जुन्या फायली चाळाव्या लागणार आहेत. जर एखाद्या नगरसेवकाने अनधिकृत बांधकाम केले असेल, तर त्याला पदावर राहण्याचा अधिकार नाही, हा संदेश आता गल्लीपासून दिल्लीपर्यंत स्पष्ट गेला पाहिजे.**

**न्यायालयाने रस्ता दाखवला आहे, पण त्यावर चालायचे काम प्रशासन आणि सजग नागरिकांचे आहे.**

**जालन्यात नवनिर्वाचित नगरसेवकांच्या मालमत्तांची आणि त्यांच्या बांधकामांची निष्पक्ष चौकशी होणार का? की राजकीय तडजोडींच्या नावाखाली या निकालाची धार बोथट केली जाणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.कायद्याचे राज्य केवळ कागदावर असून चालत नाही, ते लोकप्रतिनिधींच्या चारित्र्यातून दिसायला हवे.**

**निवडणुकीत पाण्यासारखा पैसा ओतून आणि सत्तेची स्वप्ने बघून सभागृहात पोहोचलेल्या किती जणांची 'खुर्ची' आता कायद्याच्या कचाट्यात सुरक्षित राहते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.**

**हा निकाल म्हणजे राजकारणातील स्वच्छतेची एक 'इमर्जन्सी ट्रीटमेंट' आहे, जी स्वीकारणे आता अनिवार्य आहे.**

# बहुजन राजकारण : पक्ष अनेक, पण दिशा कुठे?

भारतीय लोकशाहीत बहुजन समाज हा केवळ मतदारांचा समूह नाही, तर तो या देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचा कणा आहे. संख्येने बहुसंख्य असूनही सत्ता, धोरणनिर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत आजही बहुजन समाज दुय्यम स्थानावरच आहे. या विसंगतीतूनच बहुजन राजकारणाचा जन्म झाला; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी त्याला दिशा दिली. मात्र आज, स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतर प्रश्न असा उभा राहतो की, बहुजनांचे राजकारण खरोखर त्यांच्या हातात आहे का, की ते पक्षीय स्वार्थात अडकले आहे? आजच्या राजकीय पटावर -खचखच्, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षांचे विविध गट, बहुजन समाज पार्टी आणि इतर अनेक आंबेडकरी पक्ष अस्तित्वात आहेत. प्रत्येकजण स्वतःला बहुजनांचा खरा प्रतिनिधी म्हणवतो. पण बहुजन समाजाची अवस्था मात्र फारशी बदललेली दिसत नाही. मग दोष कुठे आहे? विचारात, नेतृत्वात, संघटनात की एकीच्या अभावात?

AIMIM ने अलिकडच्या काळात राष्ट्रीय राजकारणात लक्ष वेधून घेतले आहे. असदुद्दीन ओवैसी यांची आक्रमक, अभ्यासपूर्ण आणि निर्भीड संसद भूमिका अनेकांना भावते. अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवर ते निर्भयपणे सरकारला जाब विचारतात, हे निर्विवाद आहे. मात्र महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत -खचखच् कडे पाहताना एक प्रश्न सतत उपस्थित राहतो, हा पक्ष बहुजनांचा आहे की मुख्यतः मुस्लिम समाजाचा? सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन, आरक्षण, आर्थिक विषमता यासारख्या आंबेडकरी मुद्द्यांवर AIMIM ची भूमिका स्पष्ट असली, तरी त्याची प्रतिमा अजूनही संकुचित सामाजिक चौकटीत अडकलेली आहे. बहुजन एकीची भाषा बोलतानाही प्रत्यक्ष व्यवहारात ती एकी दिसून येत नाही.

वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा वैचारिक सूर आणला. 'बहुजन' या संकल्पनेला व्यापक अर्थ देत दलित, आदिवासी, ओबीसी, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक आणि वंचित घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या विचारांचा संदर्भ देत वंचितने राजकीय चर्चेला वैचारिक खोली दिली. मात्र निवडणुकीच्या रणांगणात वंचितची ताकद तितकी प्रभावी ठरत नाही. नेतृत्वाभोवती केंद्रीकरण, स्थानिक पातळीवरील कमकुवत संघटन आणि सातत्याने अपयशी ठरणारे निवडणूक निकाल, या सगळ्यामुळे वंचितचा वैचारिक प्रभाव राजकीय सत्तेत रूपांतरित होत नाही. विचार असणे महत्त्वाचे असते, पण तो जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी मजबूत संघटन आणि व्यवहार्यता तितकीच गरजेची असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष हा आंबेडकरी चळवळीचा राजकीय वारसदार मानला जातो.

मात्र आज रिपब्लिकन पक्ष ही एक संघटना नसून, गटांची गर्दी बनली आहे. प्रत्येक गट स्वतंत्रपणे सत्ताधारी पक्षांशी समझोते करतो, मंत्रीपदे मिळवतो, पण बहुजन समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस लढा उभारताना दिसत नाही. यामुळे रिपब्लिकन पक्षांवर 'सत्तेचे उपग्रह' किंवा 'बी-टीम' अशी टीका होते. आंबेडकरांच्या नावाचा वापर करून वैयक्तिक राजकीय लाभ मिळवणे, हीच रिपब्लिकन चळवळीची ओळख बनल्याचे चित्र दुर्दैवाने निर्माण झाले आहे. वारसा मोठा असला, तरी तो सांभाळण्याची जबाबदारी अनेकांनी टाळली आहे.

कांशीराम आणि मायावती यांच्या नेतृत्वाखाली बसपा ने 'बहुजन' या संकल्पनेला राष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठा मिळवून दिली. उत्तर प्रदेशात सत्ता मिळवण्याचा अनुभव हा भारतीय बहुजन चळवळीतील महत्त्वाचा टप्पा होता. मात्र महाराष्ट्रात बसपा जवळपास अप्रासंगिक ठरली आहे. स्थानिक नेतृत्वाचा अभाव, संघटनात्मक मरगळ आणि बदलत्या सामाजिक वास्तवाशी जुळवून न घेण्याची मानसिकता यामुळे बसपा महाराष्ट्रात प्रभाव पाडू शकलेली नाही. राष्ट्रीय पातळीवर मोठा विचार असला, तरी स्थानिक जमिनीवर रुजण्याची तयारी नसल्यास तो विचार केवळ घोषणांपुरता मर्यादित राहतो.

या सगळ्या पक्षांचे विश्लेषण केल्यावर एक गोष्ट स्पष्ट होते, कोणताही एक पक्ष पूर्णपणे सरस नाही. प्रत्येकाकडे काही बलस्थानं आहेत, तसंच गंभीर मर्यादाही आहेत. पण बहुजन समाजासाठी सर्वात घातक बाब म्हणजे या पक्षांमधील परस्पर स्पर्धा, अहंकार आणि अविश्वास. बहुजनांचे मत विभाजित राहिले, तर सत्तेची चावी नेहमीच इतरांच्या हातात राहणार. हे वास्तव वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही इतिहासातून धडा घेण्याऐवजी बहुजन राजकारण आजही तुकड्यांत विभागलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले होते. सत्ता ही अंतिम उद्दिष्ट नव्हती; ती साधन होती. आज मात्र बहुजन राजकारणात सत्ता हीच अंतिम ध्येय बनलेली दिसते. विचार, मूल्ये आणि दीर्घकालीन सामाजिक परिवर्तन याऐवजी तात्कालिक लाभ, पदे आणि निवडणुकीतील गणिते यांना प्राधान्य दिले जाते.

आज गरज आहे ती एका नव्या आत्मपरीक्षणाची. पक्ष बदलून प्रश्न सुटणार नाहीत, जोपर्यंत बहुजन एकी प्रामाणिकपणे घडत नाही, नेतृत्व वैयक्तिक स्वार्थापेक्षा चळवळीला प्राधान्य देत नाही आणि आंबेडकरवाद केवळ घोषणांपुरता न राहता कृतीत उतरत नाही. बहुजन समाजासाठी खरा प्रश्न 'कोणता पक्ष सरस?' हा नाही, तर 'बहुजन समाज स्वतः कधी सरस होणार?' हा आहे. जो दिवस बहुजन समाज आपले मत, आपली ताकद आणि आपली दिशा एकत्र करेल, त्या दिवशी कोणताही पक्ष सरस ठरेल, कारण सत्ता बहुजनांच्या हातात असेल. आज बहुजन समाजासमोर प्रश्न पक्षाचा नाही, भूमिकेचा आहे. नाव वेगवेगळी असू शकतात, झेंडे वेगवेगळे असू शकतात; पण शोषण एकच आहे, अन्याय एकच आहे आणि संघर्षाची गरजही एकच आहे.

मतांची विभागणी करून कुणाचाच उद्धार झालेला नाही; उलट सत्तेचे दरवाजे नेहमीच इतरांसाठी खुले राहिले आहेत.

आता वेळ आली आहे ती भावनिक निष्ठेपेक्षा वैचारिक शहाणपण निवडण्याची, नेतृत्वाच्या अहंकारापेक्षा बहुजन एकतेला प्राधान्य देण्याची आणि बाबासाहेबांचा विचार पोस्टरवर नव्हे, तर प्रत्यक्ष राजकारणात उतरवण्याची. बहुजन समाजाने ठरवले तर सत्ता दूर नाही. पण त्यासाठी प्रश्न विचारणारी जनता, जवाबदारी स्वीकारणारे नेते आणि तुकड्यांत नव्हे तर एकत्र लढणारी चळवळ उभी राहावी लागेल.

कारण इतिहास एकच शिकवतो, बहुजन एक झाले, तर सत्ता त्यांच्या पायाशी येते आणि बहुजन फुटले, तर सत्ता कायमच दूर राहते.

**-प्रवीण बागडे ,नागपूर**

# जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारे अभ्यासू नेतृत्व हरपले; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज पुरोहित यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मुंबईतील भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचे आधारस्तंभ राज पुरोहित यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाने राजकीय क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुरोहित यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारे एक अभ्यासू आणि क्रियाशील नेतृत्व आपण गमावले आहे, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.



पक्ष संघटनेचा खंबीर आधारस्तंभ

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले की, राज पुरोहित यांनी पक्ष संघटनेच्या बांधणीसाठी आपले आयुष्य समर्पित केले. मुंबईतील सामान्य माणसाचा आवाज म्हणून त्यांनी नेहमीच प्रभावी कामगिरी बजावली. मग ते सत्तेत असोत वा विरोधी बाकावर, त्यांनी मांडलेले प्रश्न आणि त्यांची आक्रमक शैली नेहमीच लक्षवेधी ठरली.

राज पुरोहित यांच्या राजकीय प्रवासातील महत्त्वाचे मुद्दे:लोकप्रिय लोकप्रतिनिधी: जनतेच्या प्रश्नांची जाण असल्यामुळेच कुलाबा आणि मुंबादेवी यांसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांतून जनतेने त्यांना वारंवार निवडून विधानसभेत पाठवले.

आक्रमक आणि अभ्यासू शैली: विधानसभेतील त्यांची भाषणे, प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी आणि बिनतोड संवाद यामुळे ते सर्वपक्षीय नेत्यांमध्ये परिचयाचे होते.सामान्यांचे नेते: दांडगा जनसंपर्क ही त्यांची मोठी जमेची बाजू होती. दक्षिण मुंबईतील राजकारणात त्यांचा शब्द प्रमाण मानला जात असे.

**'पक्ष परिवारावर दुःखाचा डोंगर'**

पुरोहित यांचे अकाली निधन हे केवळ त्यांच्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण भाजप पक्ष परिवाराचे मोठे नुकसान असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

त्यांच्या निधनामुळे आम्हा कार्यकर्त्यांवर दुःखाचा आघात झाला आहे. या कठीण प्रसंगातून सावरण्याचे बळ त्यांच्या कुटुंबाला मिळो, अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी केली.

राज पुरोहित यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, अशी प्रार्थना करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शंकर महाजन यांचा हिप्परगा येथे जंगी सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर (प्रतिनिधी)** कोणताही राजकीय वारसा नसताना, निव्वळ जनसेवेच्या जोरावर आपली ओळख निर्माण करणाऱ्या एका सामान्य कार्यकर्त्याची दखल घेत, वंचित बहुजन आघाडीचे पक्षप्रमुख ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी शंकर महाजन यांची नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी निवड केली. या निवडीबद्दल हिप्परगा (ता. देगलूर) येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.



शंकर महाजन हे सगरोळी ग्रामपंचायतीचे सदस्य असून, त्यांची ओळख एक मनमिळावू आणि संकटकाळी मदतीला धावून जाणारे नेतृत्व अशी आहे. जात, धर्म किंवा पक्षाचा विचार न करता जनसामान्यांची कामे करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच पक्षाने त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे. हिप्परगा येथील ग्रामस्थांनी आणि कार्यकर्त्यांनी हा सत्कार सोहळा आयोजित करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रहेबर इनामदार होते. व्यासपीठावर पोलीस पाटील शंकर महाराज मठपती, व्यंकट तुकडे, माजी ग्रामपंचायत सदस्य अहमद इनामदार, आबन्ना आमेटवार, मातंग समाजाचे शाखाध्यक्ष भगवान एडकेवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन प्रामुख्याने महाजन यांचे खंबीर समर्थक शंकर बोडके, तालुका सदस्य मारोती एडकेवार आणि शाखाध्यक्ष मुजू सय्यद यांनी केले होते.

**'तुमची हाक, माझी साथ' - शंकर महाजन**

सत्काराला उत्तर देताना शंकर महाजन भावूक झाले. ते म्हणाले, पक्षाने एका ग्रामीण भागातील सामान्य कार्यकर्त्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याला मी तडा जाऊ देणार नाही. आपल्या भागात कोणालाही कोणतीही अडचण आल्यास मी सदैव तुमच्या पाठीशी उभा असेन. तुमची हाक हीच माझी साथ असेल. त्यांच्या या आश्वासनानंतर उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.कार्यक्रमास उपस्थित मान्यवर आणि कार्यकर्ते: यावेळी सुनील अंजनीकर, नागनाथ धनुरे, देविदास आमेटवार, बालाजी एडकेवार, जकोजी एडकेवार, नय्युम चौधरी, गौस शेख, मारोती तंगनोड, गौस सय्यद, बेनोलेकर मामा यांच्यासह मोठ्या संख्येने संविधान प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार शाखाध्यक्ष मुजू सय्यद यांनी मानले. या सोहळ्यामुळे परिसरात वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

# श्रीरामपुरात चौथे राज्यस्तरीय 'युगस्त्री फातिमाबी शेख' साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** भारताच्या पहिल्या मराठी मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त, ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, श्रीरामपूर यांच्या वतीने आयोजित चौथे राज्यस्तरीय युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य संमेलन ११ जानेवारी २०२६ रोजी बेलापूर रोडवरील ऑकेशन्स बँक्वेट हॉल येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या या संमेलनाने साहित्यप्रेमींचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या संमेलनातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या कवी संमेलन सत्रात, नागपूर येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रवीण बागडे आणि प्रभाकर सोमकुवर यांचा विशेष गौरव करण्यात आला. 'युगस्त्री फातिमा माई' या विषयावर आणि वर्तमानातील सामाजिक वास्तव मांडणाऱ्या प्रभावी काव्यवाचनासाठी त्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रवीण बागडे यांच्या सामाजिक आशय असलेल्या कवितांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या या यशाबद्दल विदर्भासह संपूर्ण राज्यातील साहित्यिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.कार्यक्रमाच्या प्रसंगी फातिमाबी शेख प्रतिनिधिक काव्यसंग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी आपले विचार मांडले.

त्या म्हणाल्या की, फातिमा शेख यांचे कार्य ऐतिहासिक आहे. त्यांची जयंती केवळ काही संस्थांपुरती मर्यादित न राहता शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये अधिकृतपणे साजरी झाली पाहिजे. तसेच, त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव म्हणून त्यांच्या नावाने स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने ठोस प्रयत्न करणे गरजेचे आहे.

हे कविसंमेलन नूरजहां शेख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अनेक कवींनी आपल्या रचना सादर केल्या.

सहभागी कवींचाही यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे नेटके प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन खाजाभाई यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शफी सैय्यद यांनी मानले. सामाजिक प्रबोधन आणि साहित्याचा मिलाफ घडवून आणणारे हे संमेलन यशस्वी करण्यासाठी ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्री गुरू तेग बहादूर साहिबजी आणि संत नामदेव : भारतीय संत परंपरेतील धर्म, मानवता व बलिदानाचा संगम

नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने श्री गुरू तेग बहादूर साहिबजी आणि संत नामदेव यांच्या भारतीय संत परंपरेतील धर्म, मानवता व बलिदानाचा संगम याविषयी या लेखातून ऊहापोह करण्यात आला आहे.भारतीय आध्यात्मिक आणि संत परंपरा ही विविध काळात, विविध प्रदेशात जन्मलेल्या थोर विभूतींनी समृद्ध झालेली आहे. या परंपरेत शीख धर्माचे नववे गुरू, हिंद दी चादर म्हणून ओळखले जाणारे श्री गुरू तेग बहादूर साहिबजी आणि महाराष्ट्रातील म्हणजेच हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव येथील वारकरी संप्रदायातील महान संत नामदेव महाराज यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. दोघांचे कार्य, विचार आणि त्याग हे धर्मरक्षण, मानवता, समता आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक मानले जातात.

संत नामदेव महाराज हे १३ व्या-१४ व्या शतकातील महान भक्त संत असून त्यांनी विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून समाजात समता, नामस्मरण आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. जात-पात, उच्च-नीच भेद नाकारून त्यांनी सामान्य जनतेला ईश्वरभक्तीचा मार्ग मोकळा करून दिला. त्यांनी रचलेल्या अभंगांमधून मानवता, करुणा आणि सामाजिक ऐक्याचे तत्त्व प्रभावीपणे मांडले गेले. संत नामदेव महाराजांची कीर्ती महाराष्ट्राच्या सीमांपुरती मर्यादित न राहता उत्तर भारतापर्यंत पोहोचली. त्यांचे अनेक अभंग पंजाबी भाषेत आहेत.

दुसरीकडे, १७ व्या शतकात शीख धर्माचे नववे गुरू श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवाधिकार आणि धार्मिक सहिष्णुतेसाठी अद्वितीय बलिदान दिले. तत्कालिन शासकाच्या धार्मिक अत्याचारांविरुद्ध उभे राहत, त्यांनी काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी प्रसंगी आपले प्राण अर्पण केले. धर्मासाठी शिश कापले गेले, परंतु त्यांनी कधीही अन्यायासमोर शरणागती पत्करली नाही. त्यामुळेच त्यांना हिंद दी चादर ही गौरवपूर्ण उपाधी प्राप्त झाली आहे.

संत नामदेव आणि श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या काळात सुमारे तीन शतकांचे अंतर असले, तरी त्यांच्या विचारांमध्ये मूलभूत समानता आढळून येते. दोघांनीही ईश्वर एकत्व, मानवमूल्ये, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. संत नामदेवांनी भक्तीच्या मार्गाने समाजपरिवर्तन घडविले, तर गुरू तेग बहादूर साहिबजी यांनी त्याग आणि बलिदानाच्या मार्गाने धर्मरक्षणाचा आदर्श निर्माण केला.

विशेष म्हणजे, संत नामदेव महाराजांचे अभंग शीख धर्माच्या पवित्र ग्रंथ गुरुग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. यावरून संत नामदेव यांच्या विचारांचा शीख धर्मपरंपरेवर झालेला प्रभाव स्पष्ट होतो. हा संबंध भारतीय संत परंपरेतील सांस्कृतिक एकात्मतेचे आणि सर्वसमावेशकतेचे उत्तम उदाहरण आहे.

आजच्या काळात श्री गुरू तेग बहादूर आणि संत नामदेव यांच्या विचारांचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. धार्मिक सहिष्णुता, सामाजिक सलोखा, मानवाधिकार आणि नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळते. श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांचे बलिदान आणि संत नामदेव यांची भक्तीपर परंपरा ही भारतीय समाजाला एकता, सद्भावना आणि राष्ट्रभावनेच्या दिशेने नेणारी दीपस्तंभ ठरते. त्यामुळे आज त्यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर भारतवर्ष विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबवून त्यांना अभिवादन करत आहे.

**- संकलन**

**जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

# संक्षिप्त

## माहिती अधिकार अंमलबजावणीत छत्रपती संभाजीनगर खंडपीठाची भरारी

**प्रलंबित प्रकरणांत ५५ टक्क्यांची घट**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने माहिती अधिकार (RTI) कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांचा निपटारा करण्यात ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या नेतृत्वाखालील नियोजनामुळे केवळ दोन वर्षांत प्रलंबित द्वितीय अपिलांच्या संख्येत ५५ टक्क्यांनी घट झाली असून, तक्रार निवारणाचा वेगही दहापटीने वाढला आहे. आकडेवारीतून स्पष्ट होणारी उल्लेखनीय कामगिरीखंडपीठाने गेल्या दोन वर्षांत निकाली काढलेल्या प्रकरणांची आकडेवारी प्रशासकीय शिस्त आणि गतीवर शिक्कामोर्तब करते:द्वितीय अपिले: सन २०२४ मध्ये १४,००१ द्वितीय अपिले निकाली काढण्यात आली, तर २०२५ मध्ये ही संख्या १०,७८३ इतकी राहिली.प्रलंबित प्रकरणांत घट: २०२४ अखेरीस ८,६९९ द्वितीय अपिले प्रलंबित होती. प्रभावी कामकाजामुळे डिसेंबर २०२५ अखेर ही संख्या केवळ ३,९४६ वर आली आहे. म्हणजेच प्रलंबित प्रकरणात सुमारे ५५ टक्के घट झाली आहे.तक्रार निवारण: तक्रारींच्या निपटारा प्रमाणात १० पटीने वाढ झाली आहे. २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये तक्रार निवारणात १० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली असून, प्रलंबित तक्रारी १६५ वरून थेट ८५ वर (५१% घट) आल्या आहेत.प्रभावी नियोजनाचा परिणामराज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या कार्यपद्धतीमुळे हा बदल शक्य झाला आहे. कामकाजात आणलेली सुसूत्रता, सुनावणी प्रक्रियेतील शिस्त आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर या त्रिसूत्रीमुळे प्रकरणांचा ढिगारा कमी झाला आहे. माहिती अधिकार कायद्याचा मुख्य उद्देश नागरिकांना वेळेत माहिती मिळवून देणे हा आहे, आणि खंडपीठाची ही कामगिरी त्या उद्देशाला बळकटी देणारी ठरली आहे.नागरिकांना माहिती अधिकार कायद्यांतर्गत वेळेत न्याय मिळावा, हाच आयोगाचा मुख्य उद्देश आहे. नियोजनबद्ध कामकाज आणि सुनावणीतील शिस्तीमुळे आम्ही प्रलंबित प्रकरणे निम्म्यावर आणू शकलो आहोत. भविष्यातही ही गती कायम राखून कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी केली जाईल.



## ज्येष्ठ महिला पुष्पाबाई मुथा यांचे जोधपूर येथे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील रहिवासी आणि एक आदरणीय व्यक्तिमत्व असलेल्या पुष्पाबाई सजनराजजी मुथा (वय ८५) यांचे रविवारी सकाळी राजस्थानमधील जोधपूर येथे वृद्धकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे मुथा परिवारासह लासूर स्टेशन परिसरात शोककळा पसरली आहे.पुष्पाबाई मुथा या एक धार्मिक आणि मनमिळावू स्वभावाच्या महिला म्हणून परिचित होत्या. त्यांनी आपल्या जीवनात कौटुंबिक जबाबदाऱ्यांसोबतच सामाजिक ऋणानुबंधही जपले होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा मोठा आणि सुशिक्षित परिवार आहे. वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक तथा प्रसिद्ध उद्योजक प्रीतमकुमार मुथा यांच्या त्या आजी होत्या.



मुथा परिवाराने दिलेल्या माहितीनुसार, स्व. पुष्पाबाई मुथा यांचा उठावना (शोकाकुल सभा) कार्यक्रम सोमवार, दिनांक १९ जानेवारी रोजी दुपारी ३:०० वाजता लासूर स्टेशन येथील जैन स्थानक येथे आयोजित करण्यात आला आहे.पुष्पाबाई सजनराजजी मुथा यांना 'एक्सप्रेस गंगापूर' परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'सुवर्ण महोत्सवी एकांकिका महोत्सवा'चा पडदा उघडणार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील कला सादरीकरण विभाग (डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स) आपल्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. या ऐतिहासिक टप्प्याचे औचित्य साधून विभागातर्फे भव्य 'सुवर्ण महोत्सवी एकांकिका महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. १९ जानेवारी ते २२ जानेवारी या कालावधीत हा महोत्सव रंगणार असल्याची माहिती विभागप्रमुख डॉ. वैशाली बोधेले यांनी दिली.




या महोत्सवाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय फुलारी यांच्या हस्ते संपन्न होणार असून, ते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानही भूषवतील. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सांस्कृतिक कार्य अधिकारी मा. शंभू विश्वासू यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवात एकूण सात एकांकिकांचे सादरीकरण होणार आहे. नाटकाच्या माध्यमातून सामाजिक आणि कौटुंबिक विषयांवर भाष्य करणाऱ्या विविध संहिता यावेळी रंगमंचावर सादर केल्या जातील.

उद्घाटन आणि पहिली एकांकिका: महोत्सवाचा शुभारंभ लेखक गोपाळ वाघमारे लिखित 'बुजगावण' या एकांकिकेने होणार आहे. इतर प्रमुख सादरीकरणे: महोत्सवाच्या पुढील दिवसांत खालील एकांकिका सादर होतील.

विद्यापीठाच्या 'डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स'च्या प्रांगणातच हे सर्व प्रयोग पार पडणार आहेत. गेल्या पाच दशकांपासून या विभागाने अनेक दिग्गज कलाकार आणि तंत्रज्ञ घडवले आहेत. त्यामुळे या सुवर्ण महोत्सवी महोत्सवाबद्दल विद्यार्थी आणि नाट्यप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.जास्तीत जास्त रसिकांनी या महोत्सवाला उपस्थित राहून कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## शासकीय जागेवर अतिक्रमण भोवले; गुगुळ पिंपरीच्या महिला ग्रा.सदस्य अपात्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली/प्रतिनिधी**/शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याचा ठपका ठेवत सेनगाव तालुक्यातील गुगुळ पिंपरी येथील ग्रामपंचायत सदस्या पार्वती नारायण इंगोले यांना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अपात्र ठरवले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.गुगुळ पिंपरी येथील रहिवासी बालाजी दशरथराव देशमुख यांनी २५ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, ग्रामपंचायत सदस्य पार्वती नारायण इंगोले यांच्या मुलांच्या नावे (सचिन नारायण इंगोले आणि रामेश्वर नारायण इंगोले) गावठाण गट क्रमांक ७४० मधील मालमत्ता क्रमांक ५३८ आणि ५३९ वर प्रत्येकी १०८९ चौ. फूट क्षेत्रावर अनधिकृत अतिक्रमण करण्यात आले होते. स्वतःच्या मालकीचे घर असतानाही केवळ शासकीय जमिनीचा ताबा मिळवण्यासाठी ही माहिती लपवून त्यांनी ग्रामपंचायत निवडणूक लढवली आणि ईश्वर चिठ्ठीद्वारे सदस्यत्व मिळवले होते, असा आरोप तक्रारदाराने केला होता.या प्रकरणाची सुनावणी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या दालनात पार पडली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे तपासल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी खालील बाबींवर शिक्कामोर्तब केले.गावठाण जमिनीवर अनधिकृत ताबा करून जागेचा वापर केल्याचे सिद्ध झाले.प्रशासनाची दिशाभूल करून माहिती लपवण्यात आली.

# पिंपळवाडी पिराची येथील ऊरुस कमिटीच्या अध्यक्षपदी उमर गुलाब शेख यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी (प्रतिनिधी/ हारून शेख)** पैठण तालुक्यातील पिंपळवाडी पिराची येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही हजरत दावल मलिक शादावल साहेब यांचा ऊरुस मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या उत्सवाच्या नियोजनासाठी आयोजित करण्यात आलेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत उमर गुलाब शेख यांची ऊरुस कमिटीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि सर्व धर्मीय बांधवांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत उत्सवाच्या यशस्वीतेसाठी विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यात उपाध्यक्षपदी संजय दिलवाले आणि मोसीन शेख यांची निवड करण्यात आली असून, संपूर्ण गावातून या निवडीचे स्वागत होत आहे.



नवनियुक्त अध्यक्ष उमर शेख यांनी ऊरुसाच्या कार्यक्रमाची माहिती देताना सांगितले की, हा सोहळा २८ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल:२८/०१/२०२६ (बुधवार): संदल शरीफ (धार्मिक मिरवणूक),२९/०१/२०२६ (गुरुवार): भव्य छबिना,३०/०१/२०२६ (शुक्रवार): जंगी कुस्त्यांचा हंगासा (मज्लेत),३१/०१/२०२६ (शनिवार): शानदार कव्वालीचा कार्यक्रम होईल.या ऊरुस महोत्सवासाठी पंचक्रोशीतून हजारो भाविक दर्शनासाठी आणि कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी येतात.

या पार्श्वभूमीवर, भाविकांनी सर्व कार्यक्रमांचा आनंद घेताना सुरक्षितता पाळावी आणि प्रशासनास सहकार्य करून शांततेत उत्सव साजरा करावा, असे आवाहन अध्यक्ष उमर शेख व कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

या निवडीनंतर उमर शेख व त्यांच्या नूतन कार्यकारी मंडळावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, ऊरुसाच्या तयारीला आता वेग आला आहे.

# ५१ वर्षांनंतर जुळले ऋणानुबंध! पिशोरच्या महात्मा फुले विद्यालयात माजी विद्यार्थी-गुरुजन स्नेहमेळावा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** माणूस आयुष्यात कितीही मोठा झाला, तरी आपल्या शाळेच्या आणि शिक्षकांच्या आठवणी कधीच विसरत नाही. याचाच प्रत्यय पिशोर येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात आला. सन १९७४-७५ च्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी ५१ वर्षांनंतर आयोजित केलेल्या 'माजी विद्यार्थी व गुरुजन स्नेहमेळाव्या'ने जुन्या आठवणींना उजाळा दिला. या सोहळ्यात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आत्मीयतेचे दर्शन घडले.



**पिशोरच्या मातीने मला मान-सन्मान दिला: आ. ज. मो. अभ्यंकर**

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेले मुंबई शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज. मो. अभ्यंकर (जे या शाळेचे तत्कालीन शिक्षक होते) यांनी अत्यंत भावूक उद्गार काढले. ते म्हणाले, विद्यार्थी दशेत अनेक अडचणींचा सामना केल्यानंतर मी पिशोरच्या विद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झालो. तत्कालीन संस्थाचालक स्व. विष्णू मोकासे, मुख्याध्यापक एकनाथ जाधव आणि पिशोरच्या मातीने मला जे प्रेम, आपुलकी आणि समतेची वागणूक दिली, ती मी कधीच विसरू शकत नाही. अमरावती जिल्ह्यातील माझे मूळ गाव आणि पिशोर या दोन्ही ठिकाणांनी मला भरभरून प्रेम दिले.

**गुरु-शिष्यांच्या नात्याचा गौरव**

महाराष्ट्र राज्याचे निवृत्त सहसचिव व तत्कालीन शिक्षक प्रीतमकुमार आठवले यांनी आपल्या मनोगतातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील जिव्हाळ्याच्या नात्याचे प्रभावी चित्रण केले. तर, शाळेचे तत्कालीन विद्यार्थी आणि सध्याचे भांगसीमाता गडाचे श्री श्री १००८ महामंडलेश्वर परमानंद गिरी महाराज यांनी संत कबीरदास महाराजांच्या दोह्यांचा संदर्भ देत गुरूचा महिमा वर्णन केला व आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष क. रा. नवले होते. मंचावर तत्कालीन शिक्षक एम. एच. सुर्वे, विठ्ठल काचोळे, बी. बी. गिरी, ज. गो. माळी, पी. एम. डहाके, निवृत्त शिक्षणाधिकारी तेजराव गाडेकर, शिक्षक सेनेचे राज्य कोषाध्यक्ष सुधाकर कापरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

निवृत्त बँक व्यवस्थापक गोविंद निकम यांनी कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला.,सूत्रसंचालन: डॉ. संजय गायकवाड यांनी आपल्या शैलीत कार्यक्रमाचे संचलन केले.,आभार प्रदर्शन: तानाजी रमणे यांनी मानले..हा सोहळा यशस्वी करण्यासाठी परमानंदगिरी महाराज, गोविंद कोल्हे, गोविंद निकम, प्रकाश जैस्वाल, प्रतिभा जोशी, सुनील आंबेकर, उमर शेख, भास्कर निकम, सुधाकर पवार, चंद्रकांत काथार, अली सय्यद, याकूब शहा, रामराव ढमाले, शेषराव मोहिते, सय्यद काझीमली, रवींद्र परदेशी यांसह सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. स्नेहभोजनाने या अविस्मरणीय मेळाव्याची सांगता झाली.

## जालन्यात घुमणार 'कहार' बोलीचा आवाज;जेईएस महाविद्यालयात सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/मराठी भाषेतील वैविध्यपूर्ण बोलींचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग व भाषा संचालनालयातर्फे राज्यभर 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. या निमित्ताने जालन्यातील जेईएस (ग.ए.ड.) महाविद्यालयात मंगळवारी सकाळी ९.०० वाजता जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण 'कहार' बोलीचा जागर होणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी दिली.भाषा संचालनालय (मुंबई) आणि जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारे स्थानिक बोलींचा जागर करून लोकसंस्कृतीचे रक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअंतर्गत जालना जिल्ह्यासाठी 'कहार' बोलीची निवड करण्यात आली आहे.

या सोहळ्यात कहार बोलीचा उगम, तिची भाषिक वैशिष्ट्ये आणि तिचे सांस्कृतिक महत्त्व यावर सखोल प्रकाश टाकला जाणार आहे.प्रमुख मार्गदर्शक: प्रा. डॉ. दिलीप बिरुटे आणि कहार बोलीतज्ज्ञ सहायक भाषा संचालक श्री. शरद यादव, आनंद गांगण, महेश लगड आणि दिलीप लादे (भाषा संचालनालय, मुंबई व छत्रपती संभाजी नगर).या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कहार बोली प्रत्यक्ष बोलणाऱ्या स्थानिक नागरिकांचे अनुभव कथन असणार आहे. केवळ चर्चाच नव्हे, तर या बोलीचा जिवंत वारसा अनुभवता यावा यासाठी कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विशेष सादरीकरणे होतील: १. काव्यवाचन: कहार बोलीतील कविता. २. लोकसंगीत: पारंपरिक लोकगीतांचे सादरीकरण. ३. लोकनृत्य: बोलीच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारी नृत्ये.स्थानिक बोली या आपल्या संस्कृतीच्या खऱ्या वाहक आहेत. त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील आणि नागरिकांमधील भाषिक जाणीव प्रगल्भ होईल. - डॉ. यशवंत सोनुने (मराठी विभाग प्रमुख, जेईएस महाविद्यालय)जालना जिल्ह्यातील मराठी भाषेचे अभ्यासक, शिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी या आगळ्यावेगळ्या बोली उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजे शहाजी महाविद्यालय, अंबेलोहळला 'AAA' मूल्यांकनात 'बी' ग्रेड प्राप्त

आत्ताच एक्सप्रेस

अंबेलोहळ/प्रतिनिधी/डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचालित राजे शहाजी वरिष्ठ महाविद्यालय, अंबेलोहळने शैक्षणिक क्षेत्रात आपली मोहोर उमटवली आहे. विद्यापीठातर्फे करण्यात आलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण मध्ये या महाविद्यालयाला 'बी' (इ) ग्रेड प्राप्त झाला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ दर तीन वर्षांनी आपल्या सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या कार्याचे मूल्यमापन शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणाद्वारे करत असते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे हे अंकेक्षण पूर्णपणे 'नॅक' च्या धर्तीवर आणि निकषांवर आधारित होते. विद्यापीठ नियुक्त समितीने महाविद्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौतिक सोयी-सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडा विभाग तसेच शैक्षणिक गुणात्मक घटकांची अतिशय पारदर्शक आणि काटेकोरपणे पाहणी केली. या कसून तपासणीनंतर महाविद्यालयाच्या सर्वांगीण कामगिरीचा गौरव करत समितीने 'बी' ग्रेड प्रदान केला आहे.महाविद्यालयाच्या या यशात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजी दादा बनकर पाटील आणि संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. गणेश बनकर पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या अंकेक्षण प्रक्रियेचे समन्वयक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी केसकर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीचे हे फळ मानले जात आहे.

महाविद्यालयाने ग्रामीण भागात मिळवलेल्या या यशामुळे अंबेलोहळ परिसरातून आणि शैक्षणिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या ग्रेडमुळे भविष्यात महाविद्यालयाच्या शैक्षणिक दर्जाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# गंगापूर महावितरणचा भोंगळा कारभार चव्हाट्यावर

**अनधिकृत वीज कनेक्शन जोमात, अधिकारी कोमात!**

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** गंगापूर शहरात सध्या महावितरण कंपनीचा अत्यंत भोंगळा कारभार पाहायला मिळत असून शहरामध्ये अनधिकृत वीज कनेक्शनने उच्छाद मांडला आहे. एकीकडे प्रामाणिकपणे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बिलांचा शॉक बसत असताना, दुसरीकडे मात्र अनधिकृत वीज उपसा करणाऱ्यांकडे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर डोळेझाक केल्याचे चित्र दिसत आहे. अनधिकृत कनेक्शन जोमात आणि अधिकारी कोमात अशी चर्चा आता संपूर्ण शहरात रंगू लागली आहे.




लाईनमन आणि वीज चोरांचे 'अर्थ'पूर्ण संबंध? शहरातील विविध भागांत उघडपणे अनधिकृत वीज जोडण्या सुरू आहेत. हे सर्व प्रकार महावितरणच्या काही लाईनमनच्या आशीर्वादाने आणि त्यांच्याशी असलेल्या आर्थिक संबंधांमुळेच सुरू असल्याची दाट शक्यता नागरिक व्यक्त करत आहेत. सर्वसामान्य जनतेला डोळ्यांनी दिसणारे हे अवैध कनेक्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांना आणि भरारी पथकाला का दिसत नाहीत? असा संतप्त सवाल आता अधिकृत वीज ग्राहक विचारत आहेत.

अधिकृत ग्राहकांना भुर्दंड अनधिकृत वीज वापरामुळे यंत्रणेवर ताण येतो, परिणामी व्होल्टेज कमी-जास्त होणे किंवा वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार घडतात. याचा नाहक त्रास प्रामाणिक ग्राहकांना सहन करावा लागत आहे. तसेच, वीज चोरीमुळे होणारी तूट भरून काढण्यासाठी अधिकृत ग्राहकांना जादा दराने बिले पाठवली जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

वरिष्ठांचे अभय की दुर्लक्ष? गंगापूर शहरातील या बेकायदेशीर प्रकाराकडे महावितरणचे वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत का? कोणत्या अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने हे 'काळे' धंदे जोमात सुरू आहेत? या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांवर आणि अनधिकृत वीज कनेक्शन धारकांवर कठोर कारवाई कधी होणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.जर महावितरणने तातडीने या अनधिकृत कनेक्शनवर हातोडा मारला नाही, तर येणाऱ्या काळात अधिकृत ग्राहक आक्रमक पवित्र घेण्याच्या तयारीत आहेत.

# पिशोर येथे रक्तदान शिबिरात ८० दात्यांचा उत्स्फूर्त सहभाग; जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून 'जीवनदान महाकुंभ' संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिशोर (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील पिशोर येथे शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज (दक्षिणपीठ, नाणिजधाम) यांच्या प्रेरणेने 'जीवनदान महाकुंभ' या महायज्ञांतर्गत भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, कसबा पिशोर येथे आयोजित या शिबिरात ८० रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.राज्यभरात ४ ते १८ जानेवारी या कालावधीत 'जीवनदान महाकुंभ' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य संकल्प गरजू व रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठा करणे हा आहे. याच अभियानाचा भाग म्हणून पिशोरमध्ये हे शिबिर घेण्यात आले.

अमृता रक्तपेढीकडून संकलन छत्रपती संभाजीनगर येथील अमृता रक्तपेढीचे डॉ. जैन, रोहित पाटील आणि त्यांच्या पथकाने रक्ताचे संकलन केले. या प्रसंगी राजू मोकासे सर, राजू अंकल मोकासे, नारायण आबाराव, संजय निकम, अंबा जाधव, पप्पू दवंगे, अक्रम पठाण, रामभाऊ शिंदे, गोविंद महाराज, राजू नवले सर यांची प्रमुख उपस्थिती होती. परिसरातील गावांमधील भाविकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.परिश्रम व यश हे शिबिर यशस्वी करण्यासाठी संप्रदायाचे तालुकाध्यक्ष नंदकिशोर परदेशी, उषाताई थोरात, आल्हाड तात्या, बावरे ताई, संतोष जाधव, कारभारी जंगले तसेच पिशोर सेवा केंद्राचे अध्यक्ष सागरभाऊ जाधव, कैलास आग्रे, स्वप्निल जानराव, भिकन हिंजे, संजय हिंजे, हिरामण बिरारे, संजय विजय जाधव, भाऊ अधिकार, भानुदास ढगे, अयोध्या श्रीखंडे, गणेश कणके, दिनेश ढगे, समाधान अधिकार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संकल्पनेतून राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत.



निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना** सोमवार, १९ जानेवारी २०२६


## संक्षिप्त

### संचारबंदीचा कडक अंमल: जालना शहरातील गजबजलेले 'जिल्हा मार्केट' पूर्णपणे बंद




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/प्रशासनाने लागू केलेल्या संचारबंदीच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील बाजारपेठांनी आज कडकडीत बंद पाळला आहे. शहरातील मुख्य व्यापार पेठ असलेले आणि नेहमी गजबजलेले 'जिल्हा मार्केट' आज पूर्णपणे ओस पडल्याचे पाहायला मिळाले.जालना शहराची आर्थिक नाडी समजल्या जाणाऱ्या जिल्हा मार्केटमध्ये दररोज हजारो लोकांची वर्दळ असते. मात्र, संचारबंदीच्या आदेशामुळे आज सकाळपासूनच व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली आहेत. कपडा बाजार, सराफा लाईन आणि जनरल स्टोअर्सच्या गल्ल्यांमध्ये आज केवळ शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि प्रशासकीय नियमांचे पालन करण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे शहरात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हा मार्केटच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि अंतर्गत चौकांमध्ये पोलीस तैनात असून विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे.

व्यापाऱ्यांचा प्रतिसाद: जिल्हा मार्केटमधील सर्व लहान-मोठ्या व्यापाऱ्यांनी संचारबंदीला सकारात्मक प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली आहेत.मार्केटला जोडणारे सर्व मुख्य रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले आहेत.अत्यावश्यक सेवा: केवळ अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व व्यवहार ठप्प आहेत.

प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जिल्हा मार्केटमधील बंद हा त्याचाच एक भाग असून, नागरिकांनी घरातच थांबून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.या संदर्भातील काही विशेष छायाचित्रे मजहर सौदागर यांनी टिपली असून, त्यात शहराच्या रिकाम्या रस्त्यांचे आणि बंद असलेल्या बाजारपेठेचे विदारक दृश्य स्पष्टपणे दिसत आहे.

### जालना जिल्ह्यात 'स्मार्ट फार्मासिस्ट २.०+' प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/रुग्ण-केंद्रित फार्मसी प्रॅक्टिसमध्ये व्यावसायिक ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी आणि फार्मासिस्टच्या व्यावहारिक क्षमता वाढवण्यासाठी जालना जिल्ह्यात 'स्मार्ट फार्मासिस्ट कोर्स २.०+' या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलच्या औषध माहिती केंद्राद्वारे प्रायोजित असलेला हा कोर्स जालना येथील डिजेपी शैक्षणिक संकुलातील श्री साई जनविकास प्रतिष्ठानच्या ओजस कॉलेज ऑफ फार्मसी येथे पार पडला.

आजच्या बदलत्या काळात फार्मासिस्टची भूमिका केवळ औषध विक्रीपुरती मर्यादित न राहता, ती 'आरोग्य दूत' म्हणून महत्त्वाची ठरत आहे. याच उद्देशाने आयोजित या प्रशिक्षणात अद्ययावत वैज्ञानिक ज्ञान आणि प्रभावी रुग्ण समुपदेशनाद्वारे सामुदायिक आरोग्य सेवा कशी मजबूत करता येईल, यावर सखोल चर्चा करण्यात आली.

प्रशिक्षण सत्रात मानवी आरोग्याशी संबंधित विविध गंभीर विषयांना स्पर्श करण्यात आला:

मूत्रपिंड आणि यकृताशी संबंधित रोगांविषयी तांत्रिक माहिती देण्यात आली.पोषण आणि आहार: प्रा. पुरुषोत्तम राखुंडे यांनी पोषण या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. संतुलित आहाराची रचना, पोषक घटकांची भूमिका आणि रुग्णांच्या गरजेनुसार ओटीसी उत्पादने व न्यूट्रास्युटिकल्सची शिफारस कशी करावी, हे त्यांनी स्पष्ट केले.

औषध वितरण करताना रुग्णांशी संवाद कसा साधावा आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेमध्ये फार्मासिस्टने कोणती जबाबदारी पार पाडावी, याचे प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले.

या कार्यक्रमाला जिल्ह्यातील औषध क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांनी उपस्थिती लावली. यामध्ये साईनाथ पवार (अध्यक्ष, रिटेल आणि व्होलसेल असोसिएशन),डॉ. विठ्ठल कुचके (प्राचार्य, ओजस औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय),सुनीलराव शेळके पाटील (उपाध्यक्ष), जितेंद्र लाखोटिया (सचिव), दिलीप जायभाये (कोषाध्यक्ष),यासोबतच शिवाजी बजाज, सुभाष जगताप, रामेश्वर कौटकर, रामेश्वर चव्हाण, संतोष उखळे आणि स्वप्नील भंडारी यांची प्रमुख उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पुरुषोत्तम राखुंडे, प्रा. प्रमोद भोसले आणि ऋषीकेश दिवटे यांनी मुख्य प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. जालना जिल्ह्यातील मोठ्या संख्येने नोंदणीकृत फार्मासिस्ट या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.थोडक्यात सांगायचे तर: समाजाला अधिक दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी अशा प्रकारच्या प्रशिक्षण उपक्रमांमुळे फार्मासिस्टना नवीन ऊर्जा आणि ज्ञान प्राप्त झाले आहे.

# इंदुबाई इंटरनॅशनल प्री-प्रायमरी स्कूलमध्ये हळदी-कुंकू सोहळा उत्साहात पैठणीच्या खेळांत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी (प्रतिनिधी)** येथील इंदुबाई इंटरनॅशनल प्री-प्रायमरी स्कूलमध्ये मकरसंक्रांतीचे औचित्य साधून हळदी-कुंकू समारंभाचे अतिशय दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आयोजित विविध स्पर्धांमध्ये आष्टी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या पत्नी सौ. मंदाताई बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. महिलांना व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज असून, अशा कार्यक्रमांमुळे महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. मंदाताईंनी संपूर्ण वेळ उपस्थित राहून महिलांचा उत्साह वाढवला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या महिलांना 'मानाची पैठणी' देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे राहिला प्रथम क्रमांक: सौ. प्रिया बंडे,द्वितीय क्रमांक: सौ. अश्विनी वाकणकर,तृतीय क्रमांक: सौ. अश्विनी घुले,चतुर्थ क्रमांक: सौ. राधिका केकान या सर्व विजेत्यांना सौ. मंदाताई लोणीकर यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.



**आईचे योगदान मुलांच्या यशात महत्त्वाचे: तुकाराम आबा सोळंके**

संस्थेचे अध्यक्ष तुकाराम आबा सोळंके यांनी आपल्या मनोगतात पालकांच्या, विशेषतः मातांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय शिक्षणासोबतच आईचे योगदान मोठे असते.

ग्रामीण भागातील महिलांना आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी आणि खेळण्यासाठी हक्काची संधी मिळावी, या उद्देशाने आम्ही या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमात संगीत खुर्ची, उखाणे, प्रश्नमंजुषा, बास्केटमध्ये बॉल टाकणे, फुगे फुगवणे आणि तळ्यात-मळ्यात यांसारख्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. 'होम मिनिस्टर' फेम आदेश बांदेकर यांच्या शैलीत विष्णु सोळंके यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन (अँकरिंग) करून कार्यक्रमात रंगत भरली.

या सोहळ्यासाठी आष्टीच्या सरपंच शोभाताई मोरे, अकोलीच्या सरपंच पल्लवीताई सोळंके, संस्थेच्या संचालिका ज्योतीताई सोळंके, प्रिन्सिपल कंटुले सर उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. उमरे, डॉ. माधुरी सरकटे, डॉ. आरती आघाव, सौ. ज्योतीताई जाजू, सौ. वाघमारे मॅडम आणि सौ. थोरात ताई यांनी चोख जबाबदारी पार पाडली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पळसे ताई, काटे ताई, तौर ताई, गुंजाळ ताई, बर्वे ताई यांच्यासह इंदुबाई इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आष्टी परिसरात महिलांसाठी प्रथमच एवढे मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### यशासाठी कठोर परिश्रमाला पर्याय नाही'; नूतन हायस्कूलमध्ये १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/तीव्र स्पर्धेच्या युगात जर यशाचे शिखर गाठायचे असेल, तर कठोर परिश्रमाला कोणताही शॉर्टकट नाही. ध्येयहीन जीवन हे नांगर नसलेल्या जहाजासारखे भरकटलेले असते, असे प्रतिपादन प्रसिद्ध पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ अहमद नूर यांनी केले.

जालना येथील नूतन हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी मुख्याध्यापक विनायक रासवे यांनी त्यांचे स्वागत केले.आजच्या युगात मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर विद्यार्थ्यांसाठी चिंतेचा विषय ठरत असल्याचे नूर यांनी नमूद केले. एका सर्वेक्षणानुसार, सरासरी भारतीय दिवसाचे किमान सहा तास मोबाईलवर घालवतो. या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता नष्ट होत असून त्यांचे अभ्यासावरून लक्ष विचलित होत आहे, असे सांगत त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित ठेवण्याचे आवाहन केले.

केवळ सक्ती म्हणून न शिकता विषयांमध्ये रुची निर्माण करा, असा सल्ला त्यांनी दिला. ते म्हणाले की:जेव्हा रुची आणि मेहनत एकत्र येतात, तेव्हा अभ्यासाचे ओझे न वाटता तो एक छंद बनतो. आपल्या विषयावर प्रेम करायला शिका, मग शिकणे आनंददायी होईल.

अभ्यासातील सातत्य टिकवण्यासाठी त्यांनी काही प्रभावी पद्धती सांगितल्या:सराव आणि पुनरावृत्ती: शिकलेल्या भागाची वारंवार उजळणी करणे.टिपणे काढणे: स्वतःच्या हस्ताक्षरात नोट्स तयार करणे.

प्रश्नोत्तर शैली: मित्रांशी विषयावर चर्चा केल्याने स्मरणशक्ती वाढते.मानवी जीवनाचा ९० टक्के भाग हा सवयींवर अवलंबून असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक चांगल्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. वेळ अत्यंत मौल्यवान आहे, तो वाया घालवू नका. स्वतःची प्रतिभा ओळखा आणि करिअरची निवड करताना स्वतःमधील सुप्त गुणांचा विचार करा, असेही नूर यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना त्यांनी हेलन केलर, स्टीफन हॉकिंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उदाहरणे दिली. गरिबी किंवा कोणत्याही अडचणींना न घाबरता जिद्दीच्या जोरावर महान यश संपादन करता येते, हे त्यांनी पटवून दिले.या कार्यक्रमास शिक्षिका मनीषा बडे, दस्तगीर शेख यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप प्रेरणादायी वातावरणात झाला.

# 'हिंद दी चादर' श्री गुरुतेग बहादूर यांना अभिवादन; जिल्ह्यातील हजारो शाळांमध्ये उत्साहात उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/ 'हिंद दी चादर' श्री गुरुतेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांचा महान त्याग, गौरवशाली इतिहास आणि मानवतावादी कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षण विभागाच्या वतीने जिल्ह्यात व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. जिल्ह्यातील हजारो शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा आणि प्रभात फेऱ्यांच्या माध्यमातून गुरूंना मानवंदना देण्यात आली.



शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील एकूण ४,४५९ शाळांपैकी बहुतांश शाळांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. उपक्रमांचे स्वरूप खालीलप्रमाणे राहिले:

निबंध व वक्तृत्व स्पर्धा: ३,९४३ शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या वैचारिक गुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

समूह गीत गायन: २,५९७ शाळांमध्ये भक्तिमय वातावरणात समूह गीतांचे सादरीकरण झाले.

प्रभात फेरी: २,९३० शाळांनी गावागावातून प्रभात फेऱ्या काढून श्री गुरुतेग बहादूर यांच्या विचारांचा प्रसार केला.

डिजिटल जनजागृती: ४,१२५ शाळांमध्ये 'हिंद दी चादर' माहितीपट आणि भक्तीगीतांच्या व्हिडिओंचे प्रदर्शन करण्यात आले.

या विविध स्पर्धांमधून जिल्हाभरातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १३६ विद्यार्थ्यांची पुढील स्तरासाठी निवड करण्यात आली आहे.

तालुकानिहाय उपक्रमांची वैशिष्ट्ये

जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात विविध शाळांनी कल्पकतेने हे उपक्रम राबवले:

नवगाव (जि.प. शाळा): येथे भव्य प्रभात फेरी काढण्यात आली आणि गुरुजींच्या जीवनावर आधारित 'हिंद दी चादर' माहितीपटाचे खास स्क्रीनिंग करण्यात आले.

पिंपळगाव गंगदेव (ता. छ. संभाजीनगर): ३५० व्या शहीदी समागम वर्षाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.तिडका (ता. सोयगाव): जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेत चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्री गुरुतेग बहादूर यांच्या जीवनातील प्रसंग रेखाटले.

जोगेश्वरी (ता. गंगापूर): प्रभात फेरीसोबतच प्रेरणादायी गीतांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या बलिदानाची माहिती देण्यात आली.

टोणगाव: येथेही प्रभात फेरी आणि चित्रकला स्पर्धांना पालकांचा व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.येणाऱ्या पिढीला आपल्या थोर संतांचा आणि हुतात्म्यांचा इतिहास कळावा, हा या उपक्रमांमागचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग अतिशय प्रेरणादायी होता. - शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर

# हा विजय माझा नसून जनतेचा विजय आहे; विकासाचे स्वप्न पूर्ण करणार - भास्कर आबा दानवे यांचा निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना महानगरपालिकेच्या अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भास्कर आबा दानवे यांनी मोठ्या मताधिक्याने ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी आणि नवनिर्वाचित प्रतिनिधींचे आभार मानण्यासाठी छ. शिवाजीनगर म्हाडा कॉलनी परिसरात भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नागरिकांनी केलेल्या उत्स्फूर्त स्वागताने संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला होता.विजयानंतर प्रथमच प्रभागात आलेल्या भास्कर आबा दानवे यांचे म्हाडा कॉलनीतील नागरिकांनी जंगी स्वागत केले. विशेषतः महिला वर्गाचा सहभाग लक्षणीय होता. ठिकठिकाणी महिलांनी त्यांचे औक्षण केले, तर तरुणांनी गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष केला. प्रभागाच्या विकासासाठी आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत, असा शब्द यावेळी उपस्थित माता-भगिनींनी दानवे यांना दिला.

या सत्कार सोहळ्याला भास्कर आबा दानवे यांच्यासोबत नवनिर्वाचित नगरसेवक सुशीलाताई दानवे, कल्याण भदनेकर, ज्योती सले आणि पदमा मानधनी यांची प्रमुख उपस्थिती होती.सत्काराला उत्तर देताना भास्कर आबा दानवे भावूक झाले होते. ते म्हणाले की, नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो मी कधीही तुटू देणार नाही. हा विजय माझा वैयक्तिक विजय नसून प्रभागातील प्रत्येक कष्टकरी आणि प्रामाणिक नागरिकाचा विजय आहे. निवडणुकीपुरते राजकारण संपले असून आता केवळ विकासाचे समाजकारण सुरू होईल.भास्कर आबांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडताना खालील मुद्द्यांवर भर दिला.मूलभूत सुविधा: रस्ते, ड्रेनेज लाईन आणि शुद्ध पाणीपुरवठ्याचे प्रश्न तातडीने मार्गी लावणार,स्वच्छता व आरोग्य: प्रभागातील स्वच्छता मोहिमेला गती देऊन आरोग्य सुविधा बळकट करणार.,सुरक्षा व सोयी: स्ट्रीटलाईटची व्यवस्था आणि लहान मुलांसाठी व ज्येष्ठांसाठी सुसज्ज उद्याने विकसित करणार,या कार्यक्रमाला छ. शिवाजीनगर म्हाडा कॉलनीतील अबालवृद्ध, महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद प्रभागात परिवर्तनाची लाट आल्याचे दर्शवत होता. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यकर्त्यांनी विजयी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.




# स्वपक्षीय नेत्यांच्या 'गद्दारी'मुळे विनोदभैय्या यादवांचा पक्षाला रामराम; भाजप प्रवेशाचे संकेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/आगामी जालना शहर महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या रणधुमाळीत काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षांतर्गत गटबाजी आणि वरिष्ठ नेत्यांच्या 'कारस्थाना'मुळे शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष विनोदभैय्या यादव आणि प्रभाग २ ब च्या उमेदवार जागृती यादव यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आपल्याच उमेदवारांना पाडण्यासाठी विरोधकांशी हातमिळवणी केल्याचा खळबळजनक आरोप करत यादव समर्थकांनी पक्षत्यागाचा निर्णय घेतला आहे.

वरिष्ठ नेत्यांवर आरोपांची तोफ

एका पत्रकार परिषदेत बोलताना विनोदभैय्या यादव यांनी काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांवर थेट निशाणा साधला. यात प्रामुख्याने खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, कल्याण दळे, अब्दुल रशीद पहलवान, अतीक खान आणि प्रदेश पदाधिकारी सतीश गणेश पाटील यांच्यावर या संपूर्ण षड्यंत्राचे सूत्रधार असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सविस्तर घटनाक्रम: असा रचला गेला 'डाव'

बी-फॉर्मसाठी संघर्ष: उमेदवारी अर्ज भरताना जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचा आरोप आहे. वेळेत बी-फॉर्म न मिळाल्याने गोंधळ उडाला होता, अखेर जिल्हाधिकारी कार्यालयात गर्दीतून मार्ग काढत शेवटच्या क्षणी अर्ज दाखल करावा लागला.यादीत फेरफार: खासदार डॉ. कल्याण काळे यांनी निश्चित केलेल्या यादीत जागृती यादव यांचे नाव होते, परंतु 'मेरीट हॉटेल'मध्ये अचानक नाव बदलून दुसऱ्याला संधी देण्याचा प्रयत्न झाला.

छाननी प्रक्रियेत खोडा: छाननीच्या दिवशी प्रदेश पदाधिकारी सतीश गणेश पाटील यांच्या नावे बनावट पत्र सादर करून जागृती यादव यांची उमेदवारी रद्द करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, निवडणूक नियमांनुसार पहिला अर्ज वैध ठरल्याने त्यांचे नाव कायम राहिले.अपक्षांना रसद: अधिकृत उमेदवार रिंगणात असतानाही पक्षातील काही नेत्यांनी अपक्ष उमेदवारांना अर्थबळ पुरवून काँग्रेस उमेदवाराच्या पराभवासाठी फिल्डिंग लावल्याचा गंभीर आरोप विनोदभैय्या यांनी केला आहे.



'काँग्रेस ही शिवसेनेची बी-टीम'

काँग्रेसचे काही स्थानिक नेते शहरात शिवसेनेची 'बी-टीम' म्हणून काम करत आहेत, असा टोला यादव यांनी लगावला. सक्षम उमेदवारांचे खच्चीकरण करून विरोधकांशी आर्थिक देवाणघेवाण करण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

'जय श्रीराम' करत भाजपच्या दिशेने

ज्या पक्षात निष्ठावंत कार्यकर्त्यांची किंमत नाही, तिथे राहण्यात अर्थ नाही, असे म्हणत विनोदभैय्या यादव आणि जागृती यादव यांनी काँग्रेसला 'जय श्रीराम' केला आहे. त्यांनी लवकरच आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करण्याचे जाहीर केले आहे.या पत्रकार परिषदेला सौ. सुनंदा चरपटे, अभयकुमार यादव यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या बंडाळीमुळे जालना शहरातील काँग्रेसच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813